दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ गुरुवार, ०९ एप्रिल २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३५८ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## ऐन उन्हाळ्यात एसटीची भाडेवाढ; प्रति टप्पा १२ रुपये वाढ

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** राज्य परिवहन प्राधिकरणाने विशिष्ट कालावधीत एसटी महामंडळाला भाडेवाढ करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाने उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये साध्या बससेवा प्रकारातील बसेसच्या प्रवासभाडे दरात परिवर्तनशील भाडे आकारणीस मंजुरी दिलेली आहे. यामुळे साध्या बसेसच्या तिकीटमध्ये प्रति टप्पा १२ रुपये वाढ होणार असल्याने सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला कात्री लागणार आहे. ही दरवाढ १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत लागू राहणार आहे.

यात्रा, सणासुदीचा काळ, सुट्ट्या, सप्ताह अखेर, अधिकतम गर्दी किंवा घाईगर्दीचा कालावधी या दरम्यान राज्य परिवहन प्राधिकरणाने तीस टक्के पर्यंत भाडेवाढ करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी सन २०२६ उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये साध्या बससेवा प्रकारातील




बसेसच्या प्रवासभाडे दरास मंजुरी दिलेली आहे. उन्हाळी गर्दीचा हंगाम कालावधी १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत साध्या बससेवा प्रकाराकरिता लागू राहणार आहे.

साधा बस सेवा प्रकार वगळता निमआराम, विनावातानुकूलित शयनआसनी, विनावातानुकूलित शयनयान, शिवशाही (वातानुकूलित), जनशिवनेरी (वातानुकूलित), शिवनेरी (वातानुकूलित), ९ मीटर ई-बस (वातानुकूलित), १२ मीटर ई-बस/ई-शिवाई, या बससेवा प्रकारातील बस भाड्यात कोणत्याही प्रकारची भाडेवाढ करण्यात आलेली नाही. भाडे दरवाढीचे परिपत्रक एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी जारी केले आहे.

महामंडळाने हंगामी भाडेदर ११.५ रुपये मंजूर केला आहे. मात्र अंतिम आकारणी १ रुपयाच्या पटीत करण्यात येणार असल्याने प्रौढांसाठी १२ रुपये आणि मुलांसाठी ७ रुपये भाडे प्रथम टप्प्यास आकारण्यात येणार आहे.

## आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर दिवा शहरात शांतता कमिटीची बैठक संपन्न; पोलीस प्रशासनाकडून खबरदारीचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)दिवा(ठाणे)**: येत्या १४ एप्रिल रोजी साजरी होणारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दिवा शहरात उत्साहात आणि शांततेत पार पडावी, यासाठी मुंब्रा पोलीस प्रशासनाच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत दिवा शहरातील सर्व जयंती उत्सवाच्या मंडळांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.





उत्सवादरम्यान शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि उत्सवाच्या आनंदाला गालबोट लागू नये, या उद्देशाने मुंब्रा पोलीस स्टेशनचे PI अमोल कोळेकर व अनिल सोनवणे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महत्त्वाची बैठक पार पडली.

या बैठकीदरम्यान विविध उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या सूचना मांडल्या, तसेच उत्सवाच्या नियोजनात येणाऱ्या संभाव्य अडचणी व समस्या पोलीस प्रशासनासमोर मांडल्या. पीआय अमोल कोळेकर यांनी या समस्या जाणून घेत, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्याच्या सूचना सर्व मंडळांना दिल्या. शांतता आणि शिस्त पाळून महामानवाची जयंती साजरी करण्याचे आवाहन यावेळी पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले.

या बैठकीला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये प्रामुख्याने नगरसेवक दीपक जाधव, समाजसेवक अमोल केंद्रे, दिनेश पाटील, सोपान जाधव, सुवर्णा कांबळे आणि उद्योजक बालाजी कदम यांच्यासह दिवा शहरातील अनेक मंडळांचे प्रतिनिधी आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले असून, यंदाची आंबेडकर जयंती दिव्यात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## डॉ.महर्षी आनंद गुरुजी आश्रमाची भूमिपूजन

महाराष्ट्र जीत

**शिंदे,प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** नाशिक जवळ असलेल्या शिंदे गावा जवळ डॉ. महर्षी आनंद गुरुजी आश्रमाची भूमिपूजन समारंभ गुरुवार दिनांक 9 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता डॉ.महर्षी आनंद गुरुजी यांचे शुभ असते संपन्न होत आहे या कार्यक्रमास सनातन हिंदू बौद्धिक विचार मनसे उपाध्यक्ष शक्ती महाराज महाकाल स्वामीजी महाराज, नाशिकचे नगरसेवक सुधाकर बडगुजर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिंदे गावचे सरपंच गोरख जाधव रामदास तुंगार भाऊसाहेब तुंगार शरद गायके तालुका संघाचे अध्यक्ष संजय सानप सचिन बिडवे हे प्रयत्नशील आहे पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने




उपस्थित राहावे असे आयोजकांच्या वतीने विनंती करण्यात आली आहे.

## जिल्हयांमध्ये ८ ते १४ एप्रिल दरम्यान ‘सामाजिक समता सप्ताह’ साजरा होणार; विविध कार्यक्रमांचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**भिवंडी, (सुनील झळके):** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे संपूर्ण राज्यात ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत ‘सामाजिक समता सप्ताह’ साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे आणि महामानवांच्या विचारांचा जागर करणे हा मुख्य उद्देश आहे.

या सात दिवसांत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ८ एप्रिल: सप्ताहाचे उद्घाटन आणि प्रत्येक कुटुंबाला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतीचे वाटप केले जाईल, ९ व १९ एप्रिल: शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर व्याख्याने, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जातील. तसेच ‘चवदार तळे सत्याग्रह’ शताब्दी वर्षानिमित्त मानवी हक्कांवर विशेष कार्यक्रम होतील, ११ एप्रिल: महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील, १२ एप्रिल: ‘संविधान जागर’ अंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले जाईल. तसेच महिलांसाठी विशेष मेळावे आयोजित करून डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या प्रगतीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली जाईल, १३ एप्रिल: ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे, आरोग्य विभागाच्या मदतीने रक्तदान शिबिरे आणि विविध वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबवले जाईल. या दिवशी जिल्हा जात पडताळणी कार्यालयामार्फत ऑनलाईन वैधता प्रमाणपत्रांचे वाटपही करण्यात येईल, १४ एप्रिल: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी त्यांना अभिवादन करून सप्ताहाचा समारोप होईल. यावेळी शेतकऱ्यांसाठी बाबासाहेबांनी केलेल्या कार्यावर विशेष व्याख्याने आयोजित केली जातील.

जिल्हास्तरावर सामाजिक कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त या सर्व कार्यक्रमांची जबाबदारी सांभाळणार असून ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

## अग्निशमन, घनकचरा व उद्यान विभागांमध्ये नव्याने दाखल झालेल्या वाहनांचे महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते लोकार्पण

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) ठाणे (08) :** ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर वाहने, शहरातील रस्ते स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी आधुनिक रोड स्वीपर मशिन्स, तसेच उद्यान विभागामध्ये धोकादायक वृक्षाच्या फांद्या छाटण्यासाठी हायड्रॉलिक एरियल लिफ्ट ही वाहने ठाणे महापालिकेत उपलब्ध करुण्यात आली आहे. या सर्व वाहनांचे लोकार्पण आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या शुभहस्ते व सर्वपक्षीय नगरसेवकांच्या उपस्थितीत ठाणे महापालिका भवन येथे करण्यात आले. या नव्या वाहनांमुळे ठाणे शहरातील आपत्कालीन सेवा, रस्त्यांची स्वच्छता व पावसाळ्यापूर्वी फांद्या छाटणी ही कामे अधिक जलदगतीने होण्यास मदत होणार असल्याचे महापौरांनी सांगितले.

यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ शानू पठाण, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त दिनेश तायडे, मधुकर बोडके,




आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह नगरसेवक अनिल भोर, दिलीप बारटक्के, राजेश मोरे, प्रशांत जाधवर, नगरसेविका प्रमिला केणी, विमल भोईर, एकता भोईर, अर्चना पाटील, नम्रता भोसले-जाधव, डॉ.दर्शना जानकर, माजी नगरसेवक एकनाथ भोईर उपस्थित होते.

ठाणे अग्निशमन विभागाची एकूण १२ अग्निशमन केंद्रे २४x७ कार्यरत असून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्वरित सेवा देण्याचे काम सातत्याने केले जात आहे. ही यंत्रणा अधिक सक्षम व्हावी यासाठी अद्ययावत आणि सुसज्ज फायर वाहने ताफ्यात समाविष्ट करण्यात आली असल्याचे महापौरांनी यावेळी नमूद केले. ही वाहने पूर्णपणे स्वयंचलित स्वरूपाची आहेत. प्रत्येक वाहनामध्ये 4000 लिटर पाण्याची क्षमता आहे तसेच, प्रथमच मल्टी आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर वाहनेही ठाणे अग्निशमन दलात दाखल झाली असून 35 मीटर उंचीपर्यत पोहचून आग विझवण्याची क्षमता या वाहनांची आहे.

ठाणे महानगरपालिका शहरातील रस्ते साफसफाई आधुनिक पध्दतीने करणेसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत एकूण चार मॅकेनिकल रोड स्वीपर मशीन मुख्य रस्त्यांच्या साफसफाईसाठी वापरण्यात येणार आहेत. या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे रस्त्यांची स्वच्छता राखून आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे, हाताने स्वच्छतेवरील अवलंबित्व कमी करणे, धूळमुक्त परिसर करणे व स्वच्छता अधिक अत्याधुनिक पध्दतीने करण्यास मदत होणार असल्याचे महापौरांनी नमूद केले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक वृक्षाच्या फांद्या छाटण्याकरिता हायड्रॉलिक एरियल लिफ्टची 5 वाहने दाखल झाली आहेत. बोलेरो पिकअप वाहनावर बसवलेली हायड्रॉलिक एरियल लिफ्ट बसविण्यात आली असून दुहेरी स्विंग आर्म यंत्रणा असलेली १० मीटर कार्यरत उंचीची हायड्रॉलिक एरियल लिफ्ट आहे. ही लिफ्ट साध्या शिडीपेक्षा अधिक सुरक्षित असून या माध्यमातून धोकादायक अति उंच वृक्षांच्या फांद्या छाटणीचे काम जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

## आरोग्य हीच खरी संपत्ती - डॉ. बप्पासाहेब चावरे



महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत/ प्रदीप पोटफोडे/पाचोड दि. ८ :** आरोग्य हीच खरी संपत्ती ही म्हण केवळ ऐकण्यापुरती नसून मानवी जीवनाचा गाभा आहे. निरोगी शरीर, शांत मन व समाज सुदृढ असेल तरच व्यक्ती, कुटुंब आणि राष्ट्र यांची प्रगती साध्य होते असे प्रतिपादन दिपक हास्पिटलचे डॉ. बप्पासाहेब चावरे यांनी केले. शिवछत्रपती महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिनानिमित्त (दि. ७) प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी वे टू हेल्थ लॅबोरेटरीचे संचालक विश्वंभर लोहगळे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. प्रारंभी मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देवून यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक नसून तो संपूर्ण मानवजातीला आरोग्याविषयी सजग करणारा, जीवनशैलीचा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा आणि निरोगी व सशक्त समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा विशेष दिवस आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गांधी बानायत यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ. हेमंतकुमार जैन यांनी केले आणि उपस्थितांचे आभार डॉ. उत्तम जाधव यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. विलास महाजन, प्रा. संदिप सातोनकर, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

### चंदा रे चंदा रे...

'नासा'ची पृथ्वीवरील नियंत्रण केंद्रे वा कोणत्याही संपर्क यंत्रणांपासून पूर्णपणे तुटलेपणाचा नियोजित टप्पा पार करून 'आर्टेमिस-२'चा परतीचा प्रवास सुरू झाला...

कोणताही मोबाइल, सॅटेलाइट, रेडिओ फोन वा अन्य कोणतीही यंत्रणा पोहोचूच शकत नाही इतक्या २,५२,७५६ मैल (सुमारे ४.२५ लाख किलोमीटर) अंतरावर साधारण पाऊण तास व्यतीत करायचा, कोणतीही दुर्बीण, कॅमेरा आदींनी कधीही न पाहिलेल्या चंद्राच्या पृष्ठभागाजवळ जायचे आणि एकविसाव्या शतकातही मानवास अजून अनभिज्ञ असलेला चंद्र आठेक हजार किलोमीटरवरून डोळे भरून पाहायचा आणि पृथ्वीवरील मानवांस त्याचे दर्शन घडवायचे ही केवळ आणि केवळ विज्ञानवृत्तीला साजेशी अजोड कामगिरी 'नासा'च्या 'आर्टेमिस- २' मोहिमेतील चार अवकाशयात्रींनी नोंदवली. जगभरातील समस्त विज्ञानप्रेमींचा ऊर या अतुलनीय कामगिरीने भरून आला असेल.

आदिमतेची आठवण करून देणारी अव्याहत सुरू असलेली बिलंदरांची नरसंहारी युद्धे एकीकडे आणि दुसरीकडे कोणत्या तरी क्षुद्र बाबाबापूच्या पायाशी अक्कल गहाण टाकणारा, धर्म/जात अशा कृत्रिम सीमांमध्ये विभागलेला हास्यास्पद वाटेल इतका केविलवाणा बुद्धिहीन समाज या वास्तवांत अडकलेल्या मानवजातीसाठी 'नासा'ची कामगिरी हरखून जावे इतकी आनंददायी. पृथ्वीपासून इतक्या लांब अंतरावर कोणीही अद्याप जाऊ शकलेला नाही. आर्टेमिसचा हा विक्रम. याआधी माणूस दोन लाख ४८ हजार मैलांचे अंतर कापू शकला. ती मर्यादाही या आर्टेमिसने ओलांडली. मानवी क्षमतेच्या मर्यादा ओलांडणे हे फक्त आणि फक्त वैज्ञानिक दृष्टिकोनच करू शकतो. हा दृष्टिकोन आणि त्याचे महत्त्व डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखा विचित्रवीर्य अध्यक्षपदी असतानाही अमेरिका अबाधित राखू शकते यातच त्या देशाचे मोठेपण. त्या वैज्ञानिक वृत्तीस अभिवादन करून 'आर्टेमिस- २' मोहिमेचा आनंद साजरा करणे इष्ट.

आर्टेमिस ही ग्रीक पुराणकथांतील प्रकाशदेव अपोलोची बहीण. विद्वत जगासही भारून टाकणाऱ्या ग्रीक कथांत 'ऑलिम्पस' पर्वतावर वास्तव्य असलेले १२ मुख्य ऑलिम्पिअन्स पूजनीय मानले जातात. आर्टेमिस ही त्यातील एक. स्त्रीस्वातंत्र्यासाठी कमालीची आग्रही असूनही आर्टेमिस चंद्रास जवळची मानली जाते. चंद्राच्या आतापर्यंत कधीही जवळ न गेलेल्या पृष्ठभागास अनुभवणाऱ्या अंतराळ मोहिमेस आर्टेमिसचे नाव देऊन तेथील वैज्ञानिक समुदायाने आपल्यातील काव्यात्मकतेचेच दर्शन घडवले असे म्हणता येईल. आत्यंतिक वैज्ञानिक वृत्तीचे बुद्धिवादी संशोधक, लेखक यांच्यातील काव्यप्रेम हे नेहमीच लोभस राहिलेले आहे. आइन्स्टाइन ते पं. नेहरू अशा अनेकांचे काव्यप्रेम सर्वश्रुत.

स्पिनोझास काव्यात्मक आदरांजली वाहणारा आइन्स्टाइन आणि हिंदी कवी 'निराला' ते रॉबर्ट फ्रॉस्ट यांच्या अनेक कविता मुखोद्गत असलेले पं. नेहरू ही विज्ञानवाद्यांतील काव्यात्मकतेची लोभस प्रतीके. अपोलो या पहिल्या चंद्रयान मोहिमेस आणखी पुढे नेणाऱ्या अवकाशयानाचे 'आर्टेमिस'चे नाव हे त्याच काव्यात्मकतेचे प्रतीक. चंद्राच्या पृथ्वीवरून आतापर्यंत कधीही न दिसलेल्या पृष्ठभागाचे मनसोक्त दर्शन घेऊन आणि घडवून 'आर्टेमिस' आता पुन्हा 'पृथ्वीचे प्रेमगीत' गात माहेराच्या वाटेवर निघेल. पृथ्वीच्या कक्षेत शिरल्यावर पॅसिफिक महासागरात सुखरूपपणे उतरल्यावर रीड वाईझमन, व्हिक्टर ग्लोव्हर, ख्रिस्टिना कोच आणि जेरेमी हॅन्सन या आर्टेमिसमधील चार अवकाशयात्रींच्या चेहऱ्यावर आतापर्यंत कोणाही मर्त्य मानवास जे जमले नाही ते साध्य केल्याचे समाधान विलसत असेल.

या अवकाश मोहिमेतील सर्वात कठीण, जीवघेणा टप्पा होता तो 'नासा'ची पृथ्वीवरील नियंत्रण केंद्रे आणि अन्य कोणत्याही संपर्क यंत्रणांपासून पूर्णपणे तुटलेपण अनुभवण्याचा. या जवळपास पाऊण तासात हे यान आणि त्यातील चार यात्रिक यांचे काय झाले, काय होणार आहे आणि तसे काही अघटित घडल्यास त्यांना शोधायचे तरी कसे आणि कोठे याचे उत्तर कोणाहीकडे नव्हते.

# आद. भीमराव आंबेडकर यांनी घेतली अपघात ग्रस्त कार्यकर्त्याची भेट

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे** : दारव्हा दिनांक ८ एप्रिल २०२६ दि.बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच समता सैनिक दलाचे राष्ट्रीय प्रमुख आणि बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आद. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा दारव्ह्याचे अध्यक्ष प्रा. सिद्धार्थ गायकवाड यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली.

बोधिसत्व बुद्ध विहार यवतमाळ च्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाची तयारी करत असताना दिनांक 26 डिसेंबर 2025 रोजी प्रा . सिद्धार्थ गायकवाड यांचा अपघात झाला होता. त्यात ते जबर जखमी झाले होते. ही बाब बुद्ध विहार बांधकाम समितीचे चेअरमन आद .रवी भगत यांनी आद. भीमराव आंबेडकर यांच्या निदर्शनात आणून दिली तेव्हा त्यांनी " या कार्यकर्त्याला











भेटलेच पाहिजे"असे उद्गार काढले.आज दिनांक 8 एप्रिल 2026 रोजी सकाळी 9.00 वाजता आद.भीमराव आंबेडकर साहेब हे प्रा. सिद्धार्थ गायकवाड सर यांच्या निवासस्थानी दाखल झाले. आद भीमराव आंबेडकर यांनी बुद्ध आणि बाबासाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी प्रा. सिद्धार्थ गायकवाड यांच्या तब्येतीची विचारपूस करून तब्येतीत लवकर सुधारणा होओ अशी मंगल कामना व्यक्त केली. एका अपघात ग्रस्त कार्यकर्त्याच्या घरी जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेऊन लवकर बरे होण्याविषयी व संस्थेचे कार्य जोमाने करण्याविषयी मंगल कामना व्यक्त केली. त्यामुळे गायकवाड परिवार आनंदित झाला. त्यामुळे साक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आपल्या घरी येऊन भेटल्याने जणू काही डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या घरी आले असे त्यांना वाटले. यावेळी परिवारातील सदस्य आयुनी . सुशीलाताई गायकवाड, प्रियंका गायकवाड,सुजाता गायकवाड यांनी त्यांचे स्वागत केले.त्यांच्यासोबत महासभेचे राज्य संघटक आद.भीमराव फुसे, बोधिसत्व बुद्ध विहार बांधकाम समितीचे चेअरमन आद. रवी भगत उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्रा.प्रशांत बागेश्वर सर यांनी केले. या छोटेखाणी कार्यक्रमाला सम्राट अशोक बौद्ध विहार समितीचे अध्यक्ष आर. के. कांबळे, साहेबराव कांबळे बापूराव तायडे, माधवराव पाईकराव, आर. एस. बोदडे , के.एच. जुमळे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी समता सैनिक दलाचे मेजर नितीन भगत यांच्या नेतृत्वाखाली आदरणीय भीमराव आंबेडकर साहेब यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी शालिग्राम गवई, दीपक खडसे, प्रा. अरविंद मनवर, राजूभाऊ मनवर, विजय गजभिये, प्रा. अमोल कांबळे, साहेबराव इंगोले, सोनबाजी खंडारे, राजकुमार कांबळे, आयुनी वंदना डेरे, नंदा पाटील, रेवानंद मुधाने , संतोष खडसे,वसंत मुधाने, महेश चक्रे सम्यक इंगळे यांनी भाग घेतला. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## सिमा भांदर्गे यांच्या काव्यसंग्रहाला प्रज्ञा प्रेरणा पुरस्कार

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** अमरावती येथील सुप्रसीध्द कवयित्री सौ . सीमा प्रदीप भांदर्गे यांच्या अभंग चांदणे या कवीता संग्रहाला नागपूरच्या प्रज्ञा बहुउद्येशीय संस्थेतर्फे दिला जाणारा वार्षीक राज्यस्तरीय प्रज्ञा प्रेरणा पुस्तक पुरस्कार २०२६ नुकताच जाहीर करण्यात आला आहे .



अभंग चांदणे या कवीता संग्रहाचे प्रकाशन अक्षरशिल्प प्रकाशन अमरावतीने केले आहे प्रस्तूत राज्य स्तरीय पुरस्कार ५ एप्रील२०२६ ला नागपूर येथे १४ वे राज्यस्तरीय साहीत्य संम्मेलनात त्यांना मान्यवरांचे हस्ते दिला गेला . कवयत्री सिमा भांदरगे यांच्या लेखणीला काव्यप्रेमी मंच तसेच अमरावती चे समस्त साहीत्यीक यांनी शुभेच्छा दिल्या आहेत .

## महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे गठण ; उपाध्यक्षपदी निलेश सोमाणी यांची निवड

महाराष्ट्र जीत

**कारंजा (प्रतिनिधी)** : विश्वभूषण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे गठण करण्यात आले असून उपाध्यक्षपदी समाजसेवी व्यक्तिमत्व तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांची निवड करण्यात आली आहे.सदर समितीमध्ये सचिव शेषराव धांडे, कार्याध्यक्ष दौलतराव हिवराळे, कोषाध्यक्ष अरविंदकुमार उचित, सहकोषाध्यक्ष रमेश भगत, उपाध्यक्ष सर्वश्री निलेश सोमाणी, वैभव



उलेमाले,सोनाजी इंगळे,सहसचिव दिगंबर साबळे,संघटक शेषराव मेश्राम, सहसंघटक जगदिश मानवतकर, माधवराव जमधाडे, सदस्य सर्वश्री प्रेमचंद कांबळे, सुनिल तायडे, बाळासाहेब रोकडे, शालीक वानखेडे, बाळासाहेब लेमले,महादेव कांबळे, राहुल बलखंडे, भाऊराव डोंगरे तर प्रसिध्दी प्रमुखपदी अजय ढवळे, विनोद तायडे, संतोष वानखेडे, संदीप डोंगरे, सुनिल कांबळे,बबनराव खिल्लारे,प्रमोद खडसे,संजय खडसे, विशाल राऊत,पप्पू घुगे,गजानन गवई, दादाराव गायकवाड,दिनेश पठाडे, प्रविण पट्टेबहादुर यांची निवड करण्यात आली आहे.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## शिवसेना उबाथा पक्षाच्या प्रवक्त्या ॲड .जयश्रीताई शेळके यांचा वाशिम दौरा



महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रविण पट्टेबहादुर) :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कणखर व्यक्तिमत्व असलेल्या प्रवक्त्या ऍड.जयश्रीताई शेळके यांचा नुकताच वाशिम दौरा संपन्न झाला. ॲड.जयश्रीताई शेळके यांनी वाशिम शहरात सह जिल्हाभरात विविध ठिकाणी विविध कार्यक्रमाला उपस्थिती लावून कार्यकर्ते समवेत चर्चा केलेली आहे.त्याचबरोबर विविध ठिकाणी त्यांनी सांत्वनपर भेटी देखील दिलेले आहेत.यावेळी त्यांनी प्रसिद्ध उद्योग तज्ञ तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक डॉ.सिद्धार्थ देवळे यांच्या निवासस्थानी देखील त्यांनी भेट देऊन त्यांचे समवेत चर्चा केलेली आहे. यावेळी डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी त्यांचे निवासस्थानी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला आहे.यावेळी त्यांचे समवेत रामदास मते पाटील,शहर प्रमुख गजानन भांदुर्गे तालुकाप्रमुख बालाजी वानखेडे, विधानसभा संपर्कप्रमुख पांडुरंग पांढरे विधानसभा समन्वय गजानन दहात्रे पाटील गटनेता वाशिम उप तालुकाप्रमुख गजानन जैताडे पाटील, राजेश बोडखे सर्कल प्रमुख आनंदा काळे,नगरसेवक सोनू बढेल नगरसेवक भावेश गोरे,विधानसभा समन्वयक सुभाष बोरकर यांच्या सह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री अनंत अंबानी यांना विकास मंदिर द्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा...

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** रिलायन्स इंडस्ट्रीजचे चेअरमन मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांचे धाकटे सुपुत्र अनंत अंबानी यांचा 10 एप्रिल रोजी वाढदिवस असतो.

श्री अनंत अंबानी यांची विशेष ओळख म्हणजे प्रसिद्ध उद्योगपती, परोपकारी व प्राणी प्रेमी. जामनगर मध्ये(गुजरात) 'वनतारा' नावाने त्यांनी 3000 एकर जागेवर प्राणी बचाव आणि पुनर्वसन केंद्र सुरू केले आहे, जे जगातील सर्वात मोठे प्राणी पुनर्वसन केंद्र मानले जाते.

त्यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेना उत्तर महाराष्ट्र प्रमुख " आय लव्ह नाशिक" फाउंडेशन चे अध्यक्ष माननीय श्री मयूर मगर व त्यांचे सहकारी श्री जॉर्ज प्रसाद वरसाला सागर। जाधव ,साहिल शेख यांनी आज विकास शाळेस सदिच्छा भेट दिली. त्यांनी संस्थेच्या सचिव डॉ सुहासिनी घोडके यांचे सोबत संवाद साधत शाळेची पाहाणी केली.

दिव्यांग बालकांना करिता संस्था व सर्व कर्मचारी व शिक्षक घेत असलेले परिश्रम



पाहून त्यांचे बाबत गौरवोद्गार काढलेयाप्रसंगी दिव्यांची बालकांना नविन तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणात मदत व्हावी, त्यांचा शिक्षण घेतांना उत्साह वाढावा याकरिता दोन नविन प्रोजेक्टर्स संस्थेला प्रदान करण्यात आले. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करताना डॉ सुहासिनी घोडके म्हणाल्या की, " या प्रोजेक्टर्स द्वारे मुलांना प्रत्यक्षात पडद्यावर बघून शिकणे सोपे जाईल." संस्था श्री मयूर मगर व श्री जॉर्ज प्रसाद वरसाला व इतर सहकारी यांचे खूप आभारी आहे. तसेच, श्री अनंत अंबानी यांना विकास परिवाराचे वतीने निरामय दीर्घायुष्य प्राप्त होवो! अशा वाढदिवसाच्या शुभेच्छा व्यक्त केल्यात.

## मौजे पिंप्री बु. येथे भूमी सुपोषण जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न; विविध उपक्रमाला दिल्या भेटी

महाराष्ट्र जीत

**वाशिम/रिसोड(प्रविण पट्टेबहादुर)** : भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र यांच्या वतीने मौजे पिंप्री बु. (ता. मंगरूळपीर) येथील ग्रामपंचायत सभागृहात बुधवार,दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी "भूमी सुपोषण" या विषयावर जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री. नितीन देविदास सोनुने हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर. एल. काळे तसेच शास्त्रज्ञ डॉ. एस. के. देशमुख आणि पशुविज्ञान तज्ञ श्री. एम. एस. देशमुख यांची उपस्थिती लाभली.

प्रास्ताविकात डॉ. एस. के. देशमुख यांनी भूमी सुपोषण अभियानाचे उद्दिष्ट, मृदा आरोग्याचे महत्त्व आणि शाश्वत शेतीसाठी आवश्यक घटक यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी शास्त्रोक्त








पद्धतीने मातीचा नमुना घेण्याची प्रक्रिया, नमुना विश्लेषणाचे महत्त्व आणि त्यावर आधारित खत व्यवस्थापन याविषयी वैज्ञानिक माहिती दिली.

पशुविज्ञान तज्ञ श्री. एम. एस. देशमुख यांनी दुग्ध व्यवसायाचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, पशुखाद्य संतुलन, मुरघास तंत्रज्ञान तसेच जनावरांच्या आरोग्य व उत्पादनक्षमतेसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले.

कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर. एल. काळे यांनी मृदा आरोग्य व्यवस्थापनाची गरज, मातीतील सेंद्रिय कर्बाचे (Soil Organic Carbon) संवर्धन, सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन, तसेच एकात्मिक पोषण व्यवस्थापन (INM) यावर सखोल विवेचन केले. त्यांनी जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी मृदा परीक्षण आधारित खत व्यवस्थापन, सेंद्रिय शेती घटकांचा वापर आणि पीक फेरपालट यांचे महत्त्व अधोरेखित केले.

तसेच त्यांनी शेतकरी बांधवांना शेतीकडे उद्योगदृष्टिकोनातून पाहण्याचे आवाहन केले आणि प्रयोगशील शेतकऱ्यांनी गट स्थापन करून शेतीपूरक उद्योग उभारावेत, यासाठी कृषी विज्ञान केंद्राकडून सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन व सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल, असे आश्वासन दिले.तांत्रिक सत्रानंतर शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक निरसन करण्यात आले. यानंतर गावातील प्रगत शेतकरी श्री. शंकर बळीराम ठाकरे यांच्या आदर्श दुग्ध व्यवसाय युनिटला प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास गावातील शेतकरी व युवक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. एस. के. देशमुख यांनी केले

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# महाराष्ट्र भूषण पुरस्काराने प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांचा गौरव

**महाराष्ट्र जीत प्रदीप पोटफोडे/पाचोड :** शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथील प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय तसेच कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुणे येथील आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय "महाराष्ट्र भूषण पुरस्कार" नुकताच प्रदान करून सन्मानित करण्यात आले.डॉ. कोठावळे हे गेल्या चार वर्षांपासून शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असून त्यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. त्यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाचे यशस्वी NAAC (नेक) मूल्यांकन, भौतिक व शैक्षणिक विकास, तसेच संस्थेची राज्यभर वाढलेली प्रतिष्ठा ही त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देणारी ठरली आहे.हा पुरस्कार सोहळा आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. गणेश विटकर आणि सचिव तेजस्विनी दिवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. या प्रसंगी विविध मान्यवरांनी उपस्थित



राहून डॉ. कोठावळे यांचे अभिनंदन केले.या यशाबद्दल छत्रपती संभाजी नगरचे खासदार तथा श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव मा. संदीपान भुमरे, संस्था अध्यक्ष मा. राजू नाना भुमरे, श्रीक्षेत्र पैठण चे आमदार विलास भुमरे, जिल्हा परिषद सदस्य तसेच छत्रपती संभाजी नगर चे जिल्हा परिषद सदस्य तथा संस्थेचे संचालक शिवराज भुमरे आदींनी डॉ. कोठावळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्या या यशामुळे शिवछत्रपती महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'सैनिक सलामी' कार्यक्रम आयोजित

■ त्रिदीप आजी,माजी सैनिक बहुउद्देशीय संघटनेचे आयोजन
■ सचिव काशिनाथ भिसे यांची माहिती

**वाशिम(प्रतिनिधी) :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याच्या अनुषंगाने त्रिदी पाजी माजी सैनिक बहुउद्देशीय संघटनेच्या वतीने सैनिक सलामी व भीम जयंती महोत्सव आयोजित केलेला आहे. महार रेजिमेंट चे संस्थापक,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करण्यासाठी त्रिदीप आजी-माजी सैनिक सैनिक बहुउद्देशीय संघटनेच्या वतीने सैनिक सलामीचे आयोजन करण्यात आले आहे.या मंगलमयी प्रसंगी आपण आपल्या सहकुटुंब व मित्रपरिवारासह उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही नम्र विनंतीकार्यक्रमाची रूपरेषा मंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठीक ०८:०० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक वाशिम येथे सर्वांची उपस्थिती.०८:१५ वा. वरिष्ठ सैनिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, समता सैनिक अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या



पुतळ्याला माल्यार्पण.०८: ३० वा.त्रिशरण-पंचशिल (हस्ते : बौद्धाचार्य हरिश्चद्र पोफळे गुरुजी)०८/४५ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला बिगुल च्या धून वर सामूहिक सैनिक सलामी (मानवंदना ) जयघोष ०९/०० वा सामूहिक फोटो सेशन,मुलाखत/बाईट अल्पोपहार नंतर कार्यक्रमाची सांगता ड्रेस कोड आजी -माजी सैनिक ड्रेस कोड ब्ल्यू कोट, पॅन्ट, व्हाईट शर्ट, टाय, रेजिमेंटल पिकॅप , ब्लॅक शूज, मेडल्स, नेम प्लेट, संघटनेचा बिल्ला,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा बिल्ला समता सैनिक दल आपल्या अधिकृत ड्रेसवर बौद्ध उपासक व उपाशीका पांढरे शुभ्र वस्त्र कार्यक्रम दिनांक वेळ व ठिकाणमंगळवार दिनांक १४ एप्रिल २०२६,सकाळी ठीक : ८:०० वा.स्थळडॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक वाशिम सूत्रसंचालन दीपक ढोले,पी.पी.अंभोरे परेड संचालन शिवदास वानखडे (मा. सै.) संतोष वानखडे(मा. सै.) सहयोग काशिनाथ भिसे (मा.सै.) निमंत्रक त्रिदीप आजी -माजी सैनिक बहुउद्देशीय संघटना वाशिम यांनी माहिती दिली आहे.

# सून असावी तर अशी...

## सासूला ओझं समजणाऱ्या पिढीला सुनेनं दाखवला आरसा!

### जिल्हाभरात सौ.कांचनताई धनंजय कपाले यांचे होत आहे अभिनंदन

**वाशिम (प्रविण पट्टेबहादुर) :** आजच्या 'मी आणि माझे कुटुंब' या संकुचित मानसिकतेच्या काळात, अनेक ठिकाणी सासू_सासरे घराला ओझे वाटू लागतात. किरकोळ कुरबुरींवरून जन्मदात्यांना वृद्धाश्रमाची वाट दाखवणाऱ्या सुनांची संख्या वाढत असताना, वाशिम येथील कांचन कपाले यांनी मात्र सासू-सुनेच्या नात्यातील 'परमार्थ' जपला आहे. स्वतःच्या सासूची एखाद्या पोटच्या मुलीपेक्षाही जास्त सेवा करून त्यांनी समाजासमोर एक असा आदर्श उभा केला आहे, जो आधुनिक पिढीच्या डोळ्यात जळजळीत अंजन घालणारा ठरला आहे. धकाधकीच्या जीवनात नात्यांमधील ओलावा हरवत चालला आहे. अशा वेळी वाशिमच्या या कुटुंबाने जोपासलेली मूल्ये ही केवळ एका घरापुरती मर्यादित नसून, संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक ठरली आहेत. ८५ वर्षीय सासू, कै. शांताबाई रमाकांत



कपाले, जेव्हा किडनी, लिव्हर आणि हृदयविकाराने पूर्णपणे अंथरुणाला खिळून होत्या, तेव्हा कांचन यांनी साडेतीन महिने क्षणभरही उसंत न घेता त्यांची शुश्रूषा केली.

न तक्रार, न थकवा केवळ निष्काम भक्तीमधे आपल्या आईची सेवा केली.

३५ किलो वजन आणि मल्टी ऑर्गन फेल्युअरकडे झुकलेली प्रकृती असताना, डॉक्टरांनीही 'केवळ सेवा' हाच पर्याय सांगितला होता. अशा कठीण प्रसंगात कांचन यांनी २४ तास सासूची काळजी घेतली. डायपर बदलणे, शारीरिक स्वच्छता राखणे आणि त्यांना जे अन्न चावता येत नव्हते, ते लिक्विड स्वरूपात मायेने भरवणे हा त्यांचा नित्यक्रम होता. विशेष म्हणजे, या काळात त्यांनी पती धनंजय यांच्याकडे कधीही थकवा व्यक्त केला नाही की कोणतीही तक्रार केली नाही. सून जेव्हा मुलीच्याही पलीकडे जाऊन सासूची सेवा करते, तेव्हा त्या घरात देवपण नांदते," हेच कांचन यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. आज अनेक सुना सासूला 'प्रतिस्पर्धी' मानतात, पण कांचन यांनी सासूमध्ये आपली 'आई' पाहिली. त्यांनी दिलेला हा संदेश आजच्या चंगळवादी समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. केवळ भौतिक सुख आणि संपत्तीची श्रीमंती न शोधता, नात्यांची श्रीमंती कशी जपावी, याचा हा जिवंत वस्तुपाठ आहे. आजच्या काळात सासू-सुनेच्या नात्याकडे संशयाने पाहणाऱ्या समाजाला कांचन यांनी दिलेली ही चपराक आहे. "सून असावी तर कांचनसारखी आणि नातवंडे असावीत तर तन्मय-मानसीसारखी!" असे म्हटले ते वावगे ठरू नये.प्रत्येक सासूला अशी सून लाभावी आणि प्रत्येक पतीला आपल्या पत्नीच्या या कार्याचा अभिमान वाटावा,असा हा हृदयस्पर्शी प्रवास या आधुनिक स्वार्थी काळात नात्यांची नवी व्याख्या सांगून जातो.

हे मात्र तितकेच सत्य. सौ.कांचनताई धनंजय कपाले यांचे या सर्व कार्याबद्दल जिल्हाभरात सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# महामानवाच्या मिरवणुकीतून समतेचा संदेश गेला पाहिजे- एपीआय जितेंद्र अडुळे

**वाशीम (प्रविण पट्टेबहादुर) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्य दि.8 एप्रिल रोजी सायंकाळी 5:30 वाजता दरम्यान स्थानिक शहर पोलीस स्थानकात पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील भीमजयंती मिरवणूक मंडळ अध्यक्ष तथा भिम अनुयायी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला सहाय्यक पोलीस निरीक्षक जितेंद्र अडुळे यांनी उपस्थित समाज बाधवांना मार्गदर्शन केले.सदर बैठीकीला नापोका अश्विन जाधव पो.कॉ. ज्ञानेश्वर घुगे हें उपस्थित होते. यावेळी जितेंद्र अडुळे पुढे म्हणाले की,महामानवाच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण संदेश देत समाजाला सजग राहण्याचे आवाहन केले आहे. मिरवणूक ही केवळ उत्सवाची परंपरा नसून ती समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे या मिरवणुकीतून समता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा ठोस





संदेश गेला पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.अडुळे यांनी पुढे सांगितले की, महामानवांच्या विचारांचा गाभा हा समतेत आहे. जाती-पाती, भेदभाव आणि अन्याय यांना दूर सारत सर्वांनी एकत्र येणे, हीच खरी जयंती साजरी करण्याची योग्य पद्धत आहे. त्यामुळे मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाने शिस्त, संयम आणि जबाबदारीचे भान ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

कायदा व सुव्यवस्थेबाबत कडक सूचना मिरवणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, नागरिकांनीही सहकार्य करणे अपेक्षित आहे.अफवांवर विश्वास ठेवू नका

भडकाऊ घोषणांपासून दूर रहा शांततेत व अनुशासनात मिरवणूक पार पाडा असे आवाहनही त्यांनी केले. समाजप्रबोधनाचा संदेश महत्त्वाचा मिरवणुकीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचार पोहोचवण्याची मोठी संधी असते. त्यामुळे केवळ ढोल-ताशा किंवा दिखाव्यापुरते न राहता, महामानवांच्या विचारांचे आचरण करणे आवश्यक असल्याचे अडुळे यांनी स्पष्ट केले."हेच खरे अभिवादन "महामानवांनी दिलेला समतेचा संदेश जनमानसात रुजवणे, सामाजिक सलोखा टिकवणे आणि एकजुटीने पुढे जाणे, हीच त्यांना खरे अभिवादन ठरेल, असे शेवटी अडुळे यांनी नमूद केले. समाजाने उत्सवाला जबाबदारीची जोड दिल्यासच खऱ्या अर्थाने परिवर्तन शक्य असा स्पष्ट संदेश या निमित्ताने दिला आहे.

# वंचित बहुजन आघाडी व बिरसा ब्रिगेडचे तीव्र आंदोलन; रास्ता रोको यशस्वी

## रास्ता रोको आंदोलन यशस्वी; अधिकारी वर्गावर ॲट्रॉसिटी गुन्हे दाखल करण्याची मागणी – जिल्हाध्यक्ष चेतन गांगुर्डे

**दिंडोरी प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** दिंडोरी तालुक्यात वंचित बहुजन आघाडी व बिरसा ब्रिगेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेले तीव्र आंदोलन आणि रास्ता रोको मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरले. हतनोरे गावातील गट क्रमांक ५ व ६ मधील जमिनी संदर्भात सुरू असलेल्या वादाच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले होते.

संबंधित जमीन ही दलित व आदिवासी समाजाशी निगडीत असल्याचा दावा करण्यात आला असून, ती जमीन भाडेतत्त्वावर देण्याच्या प्रक्रियेला तीव्र विरोध करण्यात आला. "जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची" या घोषवाक्याखाली आंदोलकांनी आपली भूमिका ठामपणे मांडली.

या आंदोलनात स्थानिक पदाधिकारी व



कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आंदोलनादरम्यान प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष चेतन गांगुर्डे यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, "दलित व आदिवासी समाजाच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत. अन्यथा आगामी काळात आणखी तीव्र आंदोलन उभारले जाईल."

या रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला, मात्र परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात प्रशासनाला यश आले. आंदोलकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन मा. तहसीलदारसाहेब व प्रशासनाकडे सादर केले असून, लवकरात लवकर योग्य तो निर्णय न झाल्यास पुढील टप्प्यात मोठा संघर्ष उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनाचे आयोजन वंचित बहुजन आघाडी व बिरसा ब्रिगेड, दिंडोरी तालुका यांच्या वतीने करण्यात आले होते,या आंदोलनात तालुका अध्यक्ष बाळासाहेब शेजवळ, महासचिव समाधान शिरसाठ, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत अहिरे, तालुका उपाध्यक्ष सागर गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख साहिल गांगुर्डे, सदस्य अमोल सोनवणे, देवसिंग खरे, वाल्मीक गायकवाड, संदीप बर्वे, ऋषी गांगुर्डे, अरुण गायकवाड, रोहिदास शिरसाठ, मातृशक्ती संघटना प्रमुख संगीता घिसाडे, बिरसा ब्रिगेड सह्याद्री अध्यक्ष नवनाथ लहानगे, बिरसा ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सर्जेराव भारमल, तसेच तालुका कमिटी सदस्य नाना कडाळे, सुदाम भोये, सागर पांढरे, राहुल जाधव, सोमनाथ जगताप, किरण गांगुर्डे यांच्यासह गणेश जाधव, ठकुबाई गारे, सुलाबाई चारोस्कर, गणेश दुशिंग, रुपेश बोरस्ते, बापू गांगुर्डे, सागर चारोस्कर आणि असंख्य महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्यामध्ये विविध पदाधिकारी व स्थानिक नेत्यांचा सक्रिय सहभाग दिसून आला.

# नाशिक–मुंबई रेल्वे प्रवास सुसाट! ६० लांब पल्ल्याच्या गाड्यांचा 'स्पीड' वाढला

**नाशिक :** देशातील विविध भागांतून नाशिकमार्गे मुंबईकडे जाणाऱ्या ६० लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांचा प्रवास आता अधिक वेगवान होणार आहे. या सर्व रेल्वेगाड्या सरासरी ताशी १२० ते १३० किलोमीटर वेगाने धावतात. मात्र, मध्य रेल्वेच्या नाशिक-मुंबई रेल्वे मार्गावरील अस्वली-पाडळी दरम्यान ताशी ७५ किलोमीटर वेगमर्यादेचे निर्बंध होते. भुसावळ विभागाने 'थ्रू फॉर्मेशन ट्रीटमेंट' (टीएफटीआर) यशस्वीरीत्या पूर्ण करून ही वेगमर्यादा कायमस्वरूपी हटवली आहे. यामुळे नाशिकमार्गे मुंबईला जाणाऱ्या प्रत्येक गाडीची आता ३ मिनिटे वाचतील आणि गाड्या वेळेत मुंबईला पोहोचण्यास मदत होईल.

मध्य रेल्वेच्या नाशिक-मुंबई मार्गावर पंजाब, दिल्ली, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश,



ओडिशा, आसाम या राज्यांसह नागपूर, अमरावतीहून येणाऱ्या गाड्या मार्गस्थ होतात. दिवसभरात या मार्गाने मुंबईला जाणाऱ्या रेल्वेगाड्यांची संख्या ६० आहे. प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा देणे, सुरक्षितता वाढवणे आणि रेल्वेचा वेग वाढवणे या उद्देशाने पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यावर मध्य रेल्वेचा भर आहे. त्याअंतर्गत भुसावळ विभागाने अस्वली-पाडळी विभागातील मार्गावर अत्यंत आव्हानात्मक असे 'थ्रू फॉर्मेशन ट्रीटमेंट' (टीएफटीआर) काम यशस्वीरीत्या पूर्ण केले. १६०.५७० ते १६०.१३७ किलोमीटर या अंतरादरम्यानच्या ८०० मीटर लांबीच्या पट्ट्यावर गेल्या अनेक काळापासून ७५ किलोमीटर प्रतितास वेगमर्यादा लागू होती.

विशेषतः पावसाळ्यात या पट्ट्यावर सातत्याने देखरेख ठेवणे आवश्यक असे.

हा विभाग घाट क्षेत्रात असल्याने आणि तिथे पोहोचण्याचे मार्ग मर्यादित असल्याने हे काम पूर्ण करणे अत्यंत आव्हानात्मक होते. येथील रेल्वे रुळांच्या पायाची उंची अंदाजे नऊ मीटर असून, त्यात २.२६ अंशांचा एक वळणदार भागही आहे. हे सर्व लक्षात घेऊन हे काम पावसाळ्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. 'टीएफटीआर'चे काम 'कट अँड कव्हर' पद्धतीने करण्यात आले. यासाठी चार उत्खनन यंत्रे, दोन जेसीबी, तीन क्रेन, रोलर आणि पाण्याचे टँकर्स वापरण्यात आले. ही संपूर्ण मोहीम ३३ 'ट्रॅफिक ब्लॉक्स'मध्ये पूर्ण करण्यात आली. मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि अभियंता पथकासह ३५ कर्मचाऱ्यांच्या बळावर हा प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण झाला.

## नांदूरमधमेश्वर शाळेची 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' योजनेत निवड

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी :** राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांमुळे येवला मतदारसंघातील निफाड तालुक्यातील नांदूरमधमेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत निवड करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे, हा मंत्री भुजबळ यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. त्यांच्या दूरदृष्टीतूनच नांदूरमधमेश्वर येथील शाळेला ही मोठी संधी प्राप्त झाली आहे. या योजनेअंतर्गत शाळेत सुसज्ज इमारत, अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या यांसारख्या सुविधा उभारल्या जाणार असून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे.

या योजनेमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक तसेच सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थिनींसाठी 'पिंक रूम'सारखी सुविधा तसेच क्रीडा क्षेत्रासाठी क्रीडा प्रबोधिनी उभारण्यात येणार असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीला नवे बळ मिळेल. शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि ग्रामीण शाळांचे सक्षमीकरण करणे या उद्दिष्टासाठी मंत्री भुजबळ सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

दरम्यान, या निवडीबद्दल परिसरातून आनंद व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे निफाड पूर्व भाग तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र भवर यांनी सांगितले की, "येवला-लासलगाव मतदारसंघासाठी ही अभिमानाची बाब आहे. मंत्री भुजबळ यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. त्यांनी नेहमीच या परिसराच्या विकासासाठी पुढाकार घेत मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत."

या निर्णयामुळे नांदूरमधमेश्वर परिसरातील शैक्षणिक विकासाला नवी दिशा मिळणार असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.

## धानोरा गावात मटन मार्केटचा जीवघेणा वळण – दारूच्या महापुरात ग्रामस्थ त्रस्त!

### धोकादायक वळणावर बाजार, अपघाताची भीती वाढली

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :** राळेगाव तालुक्यातील धानोरा गावात दर मंगळवारी भरणारा बाजार सध्या नागरिकांच्या जीवावर बेतणारा ठरत आहे. गावातील भाजीपाला मार्केट आतमध्ये असताना, मटन मार्केट मात्र धोकादायक वळणावरच भरवले जाते, त्यामुळे प्रत्येक आठवड्याला अपघाताची भीती वाढत चालली आहे.



या वळणावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने ये-जा करणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होतो. त्यातच रेती तस्करांची विना परवाना ओव्हरलोड वाहतूक आणि अतिवेग यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. या जड वाहतुकीमुळे रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

बाजाराच्या दिवशी दुकानदार अक्षरशः रस्त्यावरच दुकाने लावतात, त्यामुळे वाहतुकीसाठी जागाच उरत नाही. वाठोडा, वनोजा आणि येवतीकडे जाणारी वाहने तसेच शेतातून येणाऱ्या बैलबंडी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. वर्दळीच्या ठिकाणी भरत असलेल्या या बाजारामुळे कधीही मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दारूच्या महापुरामुळे गावात असंतोष दरम्यान, मटन मार्केटलगतच असलेले देशी दारूचे दुकान गावासाठी आणखी एक गंभीर समस्या ठरत आहे. येथे रोज मोठ्या प्रमाणात दारूची विक्री होत असून, गावात अक्षरशः दारूचा महापूर वाहताना दिसतो. ग्रामस्थांनी अनेकदा दारूबंदीची मागणी केली, मात्र त्यांच्या प्रयत्नांना यश आलेले नाही.

यामुळे गावातील तरुण पिढी व्यसनाधीन होत चालली असून, सामाजिक वातावरण बिघडत आहे. काही नागरिकांनी तर प्रशासन आणि पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दारू विक्रेत्यांवर कारवाई का होत नाही? हप्तेखोरीमुळे दुर्लक्ष केले जाते का? असे सवाल आता उघडपणे विचारले जात आहेत.

ग्रामपंचायतीकडून दुर्लक्षाचा आरोप ग्रामस्थांचा आरोप आहे की, दुकानदारांकडून ग्रामपंचायत टॅक्स वसूल केला जातो, मात्र त्याबदल्यात सुरक्षित जागा उपलब्ध करून देण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकीकडे अपघाताचा धोका आणि दुसरीकडे दारूचे वाढते प्रमाण, यामुळे धानोरा गावातील नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

धानोरा गावातील मटन मार्केट सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करणे, धोकादायक वळणावरील अतिक्रमण हटवणे, ओव्हरलोड वाहतुकीवर कडक कारवाई करणे आणि देशी दारूच्या विक्रीवर नियंत्रण आणणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी होऊ शकते. यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अन्यथा ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

## उन्हाळ्याच्या पूर्वतयारीसाठी विविध भागांत आज वीज बंद; महावितरणचे सहकार्याचे आवाहन

**नागपूर :** कडाक्याचा उन्हाळा लक्षात घेता, वीज ग्राहकांना उन्हाळ्यात अखंडित सेवा मिळावी यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. ग्रीष्म ऋतूतील संभाव्य तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी महावितरणतर्फे बुधवारी, 8 एप्रिल रोजी शहरातील विविध विभागांमध्ये वीजवाहिन्यांची देखभाल, दुरुस्ती आणि झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येणार आहे. या तातडीच्या कामासाठी नागपुरातील अनेक भागांचा वीजपुरवठा सकाळी काही तासांसाठी बंद राहणार असून, ग्राहकांनी या काळात महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कॉंग्रेसनगर विभागात कामाचे स्वरूप पाहता विविध गटांत वीज पुरवठा खंडित राहील. सकाळी ९ ते १२ या वेळेत नेल्को सोसायटी, सुमित नगर, अध्यापक लेआउट, आझाद हिंद नगर, टाकळी सिम पाण्याची टाकी परिसर आणि एलआयजी-एमआयजी कॉलनीमध्ये वीज नसेल. सकाळी ८ ते ११ दरम्यान जय बद्रीनाथ सोसायटी, राऊत वाडी, लोकसेवा नगर, मनीष लेआउट, गायत्री नगर, परसोडी आणि हनुमान मंदिर परिसरातील वीज पुरवठा बंद राहील. तसेच स्वावलंबी नगर, दिनदयाल नगर (सकाळी ८:३० ते १२) आणि जयप्रकाश नगर, सीता नगर, महालक्ष्मी मंदिर परिसर (सकाळी ८ ते १२) या भागातही देखभाल कार्य चालणार आहे. महाजन मार्केट आणि आयुर्वेदिक मार्केटमध्ये सकाळी ८ ते १०, तर इटरनिटी मॉल, व्हीआयपी रोड, काचीपुरा आणि सेंट्रल मॉल परिसरात सकाळी ७ ते १० या वेळेत वीज पुरवठा खंडित असेल.

महाल विभागांतर्गत ओंकार नगर, जयवंत नगर, साई नगर आणि गजानन नगर भागात सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद राहील.

अयोध्या नगर, उदय नगर चौक आणि साई मंदिर परिसरात सकाळी ७:३० ते १२:३० पर्यंत, तर मेडिकल चौक, रामबाग कॉलनी, जाटतरोडी आणि टी.बी. वार्ड परिसरात सकाळी ९ ते दुपारी १:३० वाजेपर्यंत तांत्रिक कामे केली जातील. त्यामुळे या बागातील वीज पुरवठा खंडित राहील.

बुटीबोरी विभागातील काचीमेट, शांतीनगर आणि संत जगनाडे नगर भागात सकाळी ७ ते १२ वीज बंद असेल. एमआयडीसी उपकेंद्रातील औद्योगिक ग्राहकांसह रिलायन्स सिमेंट आणि ईशान कास्टींग यांसारख्या मोठ्या उद्योगांचा वीजपुरवठा सकाळी १० वाजल्यापासून बंद ठेवण्यात येणार आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत ग्राहकांना तांत्रिक बिघाडामुळे त्रास होऊ नये, यासाठी नवीन एबी स्विच बसवणे आणि ट्रान्सफॉर्मरची देखभाल करणे अनिवार्य आहे.

या नियोजित कामामुळे होणाऱ्या तात्पुरत्या गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगिरी व्यक्त केली असून, नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सिल्लोडच्या १२ रुग्णांवर होणार मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**सिल्लोड :** नॅशनल आयुर्वेदिक हॉस्पिटल, सिल्लोड आणि लायन्स क्लब, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरातून शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या १२ रुग्णांना बुधवारी (दि. ८) पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरकडे रवाना करण्यात आले.

सोमवारी (दि. ६) नॅशनल आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये हे शिबिर पार पडले. यात तज्ज्ञ डॉक्टरांनी सुमारे १०० रुग्णांची नेत्रतपासणी केली. त्यापैकी मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज असलेल्या १२ गरजू रुग्णांची अंतिम निवड करण्यात आली. या रुग्णांवर लायन्स क्लब, छत्रपती संभाजीनगर येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.



बुधवारी सकाळी रुग्णांना रुग्णालयातून निरोप देण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष अब्दुल समीर अब्दुल सत्तार आणि जिल्हा परिषद सदस्य ॲड. अब्दुल आमेर अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली व यशस्वी शस्त्रक्रियेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी डॉ. अहेमद शरीफ, डॉ. विशाल आकाते यांच्यासह रुग्णालयीन कर्मचारी उपस्थित होते. नॅशनल आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## बालमृत्यू दफनभूमीसाठी शासन स्तरावर जागा उपलब्ध करण्याची मागणी

**नवीन पनवेल वार्ताहर :** बालमृत्यू दफनभूमीसाठी शासन स्तरावर पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, परिसरात जागा उपलब्ध करून देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी आमदार विक्रांत पाटील आणि जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे केली आहे. वाढते प्रदूषण तसेच निसर्गाच्या हानीमुळे मानवी जीवन जिकरीचे झाले आहे. सध्याच्या युगात नव्याने जन्माला येणाऱ्या नवोदयात बालकांमध्ये कमी दिवसात जन्माला येणारे बालकांचे प्रमाण वाढत आहे. अशातच सहाव्या आणि आठव्या महिन्यात जन्माला आलेली मुले अवयवात योग्य वाढ होत नसल्याने बहुदा मृत्युमुखी पडतात अशा आणि इतर मयत बालकांच्या मृत्यूच्या संख्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. पनवेल हद्दीत अशा प्रसंगी मयत बालकांच्या शवाला दफन करण्यास नातेवाईकांना बहुदा दफन जागेअभावी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक तास या मयत बालकाच्या शवाची हेळसांड होत असते. अंतिम संस्कारात विघ्न आल्याने मृतांच्या नातेवाईकांचे हाल होत आहेत.

तरी याविषयी गांभीर्याने लक्ष देऊन मयत बालकांच्या शवासाठी दफनभूमीच्या जागेची व्यवस्था उपलब्ध करून नातेवाईकांची होत असलेली अवहेलना दूर करावी अशी मागणी विनायक गांधी यांनी केली आहे.

## बनावट प्रमाणपत्रांना लगाम : निफाड तहसीलकडून QR कोडसह नवे प्रमाणपत्र स्वरूप

**नाशिक** : नागरिकांना अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा पुरवण्याच्या उद्देशाने निफाड तहसील कार्यालयाने प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. आता तहसील कार्यालयामार्फत दिली जाणारी सर्व प्रकारची प्रमाणपत्रे 'हायटेक' स्वरूपात उपलब्ध होणार असून त्यावर अर्जदाराचा फोटो आणि QR कोड अनिवार्य करण्यात आला आहे.

या नव्या प्रणालीअंतर्गत जात, उत्पन्न, रहिवासी, नॉन-क्रीमी लेयर आदी विविध प्रमाणपत्रांवर अर्जदाराचा छायाचित्रासह QR कोड छापण्यात येणार आहे. QR कोड स्कॅन केल्यास संबंधित प्रमाणपत्राची तत्काळ ऑनलाइन पडताळणी करता येणार आहे. त्यामुळे शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था तसेच इतर यंत्रणांमध्ये प्रमाणपत्रांची सत्यता पडताळण्याची प्रक्रिया अधिक जलद, सोपी आणि विश्वासार्ह होणार आहे.

यामुळे बनावट प्रमाणपत्रांच्या प्रकारांना मोठ्या प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच प्रमाणपत्रावर अर्जदाराचा फोटो असल्यामुळे त्याचा गैरवापर होण्याची शक्यता कमी होणार आहे.

नवीन प्रणालीमध्ये अर्जदाराचा मोबाईल क्रमांकही नोंदवला जाणार असून अर्जाच्या स्थितीची माहिती थेट मोबाईलवर मिळणार आहे. यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात येण्याची गरज कमी होऊन त्यांचा वेळ व श्रम वाचणार आहेत.

तहसील कार्यालयाने नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रमाणपत्रांसाठी अर्ज करताना आवश्यक माहिती अचूक व पूर्ण द्यावी आणि या आधुनिक सुविधेचा लाभ घ्यावा.

तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी सांगितले की, "प्रमाणपत्रांवर QR कोड व अर्जदाराचा फोटो समाविष्ट केल्यामुळे बनावट प्रमाणपत्रांवर नियंत्रण मिळवता येईल. QR कोड स्कॅन करून प्रमाणपत्रांची तत्काळ पडताळणी करता येईल.

तसेच मोबाईल नंबर जोडल्यामुळे अर्जदारांना अर्जाची सद्यस्थिती समजेल, ज्यामुळे नागरिकांचा वेळ वाचेल आणि सेवा अधिक सुलभ होईल."